वाचलेः-१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) क्र.माध्य/शि/०१/कावि/७८२/२०२१दि.१८/१२/२००७
३) मा.आयुक्त,यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
४) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय भोसरी यांच्याकडील पत्र क्र.माविभो/०१/कावि/४०१/२०२४ दि.२१/०६/२०२४ चे पत्र
५) दि. २७/०६/२०२४ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/४१२/२०२४
दि.२७/०६/२०२४

विषय –नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.

**श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक संगणक क्र.५९०६**

आदेश,

**श्री.भिसे मधुकर रावसाहेब** हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **"सहाय्यक शिक्षक"** या पदावर दि.०४/०२/१९९१ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु झालेले आहेत. श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक यांच्या मुळ सेवानोंद पुस्तकानुसार त्यांची जन्मतारीख दिनांक १४/०६/१९६६ अशी असुन दिनांक १३/०६/२०२४ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पुर्ण होत असल्याने **श्री.भिसे मधुकर रावसाहेब "सहाय्यक शिक्षक"** यांना दि.३०/०६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१) नुसार गट "क" मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

**श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक** सद्यस्थितीत यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहनकर्ज, संगणक कर्ज, घरदूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही. भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील, तसेच त्यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षक पतपेढी मर्यादित यांच्याकडील दाखला क्र.१५/२०२४-२०२५ दि.१०/०६/२०२४ रोजीच्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार **श्री.भिसे मधुकर रावसाहेब, सहाय्यक शिक्षक** यांच्याकडे रक्कम रूपये -३,००,००/- (अक्षरी - तीन लाख रूपये फक्त ) एवढी थकबाकी असुन सदर रक्कम वसुल करून माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांना अदा करणे आवश्यक आहे. रक्कम रूपये -३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रूपये फक्त) वसुलीच्या अधिन राहून श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक यांना सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब,मी सहाय्यक आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८ उपरोक्त वाचले क्र.०३ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार याआदेशान्वये श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक यांना माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित रक्कम रूपये -३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रूपये फक्त) रक्कमेची वसुली करणेस अधिन राहून, दि.३०/६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.भिसे मधुकर रावसाहेब,सहाय्यक शिक्षक
माध्यमिक विद्यालय भोसरी

प्रतः- १) लेखा शाखा
२/- श्री.भिसे मधुकर रावसाहेब, सहाय्यक शिक्षक यांना देय असलेल्या रक्कमेतुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादीत यांना रक्कमल रूपये ३,००,०००/- (तीन लाख रूपये फक्त) यांना अदा करणेत यावे.
३) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
४) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
५) माध्यमिक विद्यालय भोसरी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

३१/०६/२०२४

(राजीव घुले )
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.